# रा. भा. शिर्के प्रशाला, रत्नागिरी

## (इ. १० वी २०१६ रिझल्ट २९२/२९७, ९८.३२ %)

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १. | कु. तेजस दत्तात्रय साखळकर | ४९५/५०० | ९९.००% |
| २. | कु. प्राजक्ता श्रीरंग वैद्य | ४८६/५०० | ९७.४०% |
| ३. | कु. सुकन्या सुनिल गोसावी | ४८६/५०० | ९७.२०% |
| ४. | कु. वैष्णवी राजेंद्र भालेकर | ४८१/५०० | ९६.२०% |
| | **क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यासह उल्लेखनीय यश** | | |
| ५. | कु. अपुर्वा राजकुमार नाचणकर | ४७३+२५/५०० | ९९.६०% |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| **विशेष प्राविण्य (Dist.)** | **१५०** |
| **प्रथम श्रेणी** | **९५** |
| **द्वितीय श्रेणी** | **४६** |
| **तृतीय श्रेणी** | **०१** |
| **एकूण** | **२९२** |

## नीळकंठ खाडीलकर पारितोषिक :

या वर्षीच्या १० वी च्या निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या प्रशालेच्या, रत्नागिरीच्या व कोकणच्या आजपर्यंच्या १० वी च्या निकालाच्या इतिहासात प्रथमच आपल्या शाळेतील कु. तेजस दत्तात्रय साखळकर याला मराठी, संस्कृत व इंग्रजी या तीन भाषांमध्ये राज्यात प्रथम आल्याबद्दल रुपये १ लाखाचे नीळकंठ खाडीलकर पारितोषिक प्राप्त झाले. कोकण विभागीय मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सौ. शकुंतला काळे यांच्या हस्ते मंडळाचे सचिव श्री. गिरीसाहेब संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. विलास पाटणे, शालेय समितीचे अध्यक्ष ॲड. विजय साखळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

## रा. भा. मेळा :-

१ मे २०१६ रोजी प्रशालेमध्ये 'रा. भा. मेळा' आयोजित करण्यात आला. शाळेच्या स्थापनेपासून सन २००० पर्यंतचे सुमारे ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि शिक्षक या मेळाव्यासाठी उपस्थित होते. श्री. उदय लोध, श्री. नितीन कानविंदे, श्री. मनोज पाटणकर, श्री. सुधन्वा कोपर्डेकर व सौ. दिप्ती कानविंदे यांच्या पुढाकाराने ही रा. भा. मेळाव्याची संकल्पना साकार झाली. दरवर्षी १ मे हा दिवस रा. भा. मेळा दिवस म्हणून साजरा करण्याकरीता सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ठरले.

सन २०१६-१७ या वर्षामध्ये महाराष्ट्र ज्ञानपीठामार्फत झालेल्या गणित परीक्षेसाठी बसलेले इयत्ता ५ वी, ६ वी व ७ वी मधील सर्व ११० विद्यार्थी उत्तीर्ण झाले व निकाल १००% लागला.

तसेच महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे मार्फत झालेल्या हिंदी विषय परीक्षेला बसलेले इ. ५ वी ते ८ वी चे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच १० वी बोर्डाच्या संपूर्ण व संयुक्त विषयाचा शाळेचा निकाल १००% लागला.

के.टी.एस. परीक्षेकरीता प्रशालेतील २६५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले व त्यापैकी १४२ जणांना प्रमाणपत्र प्राप्त झाले. शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेला ४४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले व निकाल १००% लागला. त्यापैकी २२ जणांना 'अे' तर २१ जणांना 'बी' ग्रेड मिळाली.

राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञा शोध परीक्षेला इ. ५ वी ते ८ वी चे एकूण १२४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले.

## शारीरिक शिक्षण विभाग :-

**सन २०१६-१७ मधील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडू :**

१) कु. वेदांत सुरज चव्हाण (७ वी अ-तायक्वाँदो स्पर्धा - सुवर्ण पदक)

२) कु. प्राची मनोज सुपल (१० वी क - पॉवरलिफ्टींग)

३) कु. मार्तंड संजय झोरे (७ वी ड - तलवारबाजी)

४) कु. प्राप्ती शिवराम किनरे (योगासन)

Scanned with OKEN Scanner

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये १६ खेळाडू सहभागी झाले. त्यामध्ये वेदांत सुरज चव्हाण (तायक्वाँदो) आणि प्राची मनोज सुपल (पॉवरलिफ्टिंग) यांनी सुवर्णपदक पटकावले.

शासकीय व खाजगी अशा अनेक क्रीडा प्रकारातील विभागीय स्पर्धांमध्ये देखील प्रशालेने उत्तुंग यश प्राप्त केले. प्रशालेचा क्रीडा महोत्सव ५ व ६ डिसेंबर २०१६ रोजी संपन्न झाला.

## स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग अहवाल :-

* शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी प्रतिवर्षाप्रमाणे दि. ३० जून २०१६ साठी प्रशालेच्या जनरल सेक्रेटरी पदासाठी निवडणूक घेण्यात आली. कु. अथर्व नेने (१० अ) विद्यार्थी प्रतिनिधी व कु. अक्षता पिसे (१० अ) विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून निवडून आले. याच दिवशी इ. ५ वी ते १० वी अखेर वर्ग प्रतिनिधींची निवड निवडणूक पध्दतीने पार पडली. मा. मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाच्या वतीने यावर्षी खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.
* लोकसंख्या विस्फोट दिन
* गुरुपौर्णिमा (व्यास पौर्णिमा) - क्रांतिदिन - ९ ऑगस्ट
* १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन
* रक्षाबंधन आणि संस्कृतदिन - शिक्षक दिन
* जागतिक ओझोन दिन
* महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती
* जागतिक एड्स विरोधी दिन, राष्ट्रीय विज्ञान दिन व कै. अरुअप्पा जोशी स्मृतीदिन गुणगौरव समारंभ इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## स्पर्धा विभाग अहवाल :-

विद्यार्थ्यांचे वक्तृत्व, निबंध, पठण क्षमता, हस्ताक्षर, शुध्दलेखन, समुहगीत गायन अशा विविध अंगांचा विचार करुन प्रशालेमध्ये वरील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. हिंदी दिनाचे औचित्य साधून देशभक्तीपर हिंदी गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. दि. २३-०९-२०१६ रोजी आंतरशालेय निबंध स्पर्धेचे आयोजन संस्थेने केले.

## NCC विभाग :-

दरवर्षी प्रमाणे या विभागात ५० छात्र सहभागी आहेत. यापैकी १४ मुली आणि ३६ मुले आहेत.

यावर्षी दापोली येथे झालेल्या वार्षिक शिबिरामध्ये आपल्या प्रशालेने सर्वसाधारण विजेते पद (Overall Championship) मिळवले. यामध्ये प्रश्नमंजूषामध्ये १) व्यंकटेश्वर शेंड्ये याने सुवर्णपदक मिळवले, २) Ship Modelling मध्ये उपविजेतेपद मिळाले यामध्ये कु. शर्विन सचिन टाकळकर (९ अ), कु. सानिका बने (९ अ) यानी भाग घेतला. ३) सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्या शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

महाराष्ट्र छात्रसेना व राष्ट्रीय हरितसेना या विभागांनीही प्रतिवर्षाप्रमाणे आपले उपक्रम यशस्वी केले.

## विज्ञान विभाग :-

१) **विज्ञानरंजन परीक्षा** :- विज्ञानरंजन परीक्षा रत्नागिरी जिल्हा विज्ञान शिक्षक मंडळ, रत्नागिरी यांच्याकडून आयोजित केली जाते. प्रशालेतील प्राथमिक गटात ३७ व माध्यमिक गटात ३८ विद्यार्थी प्रविष्ठ झाले.

Scanned with OKEN Scanner

**२) डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा** :- इ. ६ वी तील अथर्व महेश कामेरकर हा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्रधारक ठरला आहे.

**4) Science Olympiad Foundation, Delhi :-** Science Olympiad Foundation यांच्या मार्फत विविध स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात. यावर्षी ९४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.

गतवर्षी NTS परीक्षेला १७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी कु. तेजस दत्तात्रय साखळकर हा राज्यस्तरीय परीक्षेत २२ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याने तो राष्ट्रीय परीक्षेस पात्र ठरला होता. NMMS परीक्षेला ०७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी कु. श्रीरंग प्रशांत पाडाळकर, कु. मंदिरा सुशिलकुमार माळवदे व कु. स्वाती माणिकराव कुलुलवाड हे शासनाच्या शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

**५) अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषद** :- अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषद, मुंबई या संस्थेमार्फत घेतल्या गेलेल्या स्पर्धेत कु. सीमा दसाणा हिच्या प्रकल्पाला उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला. दि. ८ ते १० डिसेंबर २०१६ दरम्यान जळगांव येथील कार्यक्रमात प्रकल्प सादर करण्याची तिला संधी प्राप्त झाली.

**६) विज्ञानछंद मंडळ** :- या वर्षीही प्रशालेत विज्ञानछंद मंडळाची स्थापना करण्यात आली. अनेक सभांचे आयोजन करण्यात आले. या सभांमध्ये विज्ञानछंद मंडळांच्या वर्षभराच्या अनेक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. (१) भित्तिपत्रक स्पर्धा, २) प्रश्नमंजुषा, ३) हस्तलिखित, ४) अंधश्रध्दा निर्मुलन, ५) शालांतर्गत विज्ञान प्रदर्शन, ६) सायन्स सर्कस इत्यादी.)

**७) अन्य** :- १) शालेय विज्ञानछंद मंडळ, विद्यार्थी स्वराज्य सभा व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १६ सप्टेंबर रोजी जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात आला.

२) पर्यावरण संस्था, रत्नागिरी आयोजित प्रकल्प अहवाल लेखन स्पर्धा प्रशालेतही आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत इ. नववीतील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३) दि. ०४/१०/२०१६ रोजी सायन्स सर्कस या उपक्रमानिमित्त प्रशालेत संस्थांतर्गत प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रशालेच्या माध्यमिक गटात द्वितीय क्रमांक तर प्राथमिक गटात प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

४) दि. ०४/१०/२०१६ रोजी प्रशालेच्या शालांतर्गत विज्ञान प्रदर्शनात 'सांडपाण्याचे शुध्दिकरण' उपकरास तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

५) दि. ६ ते ८ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत र. ए. सोसायटी व लॅटिटयुड्झ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायन्स सर्कस या उपक्रमाचे आयोजन केले गेले.

## संगणक व ई-लर्निंग कक्ष :-

प्रशालेमध्ये इ. ९ वी व इ. १० वी च्या विद्यार्थ्यांकरिता शासनमान्य स्वतंत्र आय. सी. टी. कक्ष आहे.

## ग्रंथालय विभाग :-

सन २०१५-१६ मध्ये आपल्या ग्रंथालयासाठी आमदार निधी मधून रु. ३०,०००/- ची पुस्तके खरेदी करण्यात आली. चालू वर्षी प्रेरणा दिनानिमित्त आर्ट सर्कलतर्फे विज्ञानाविषयक ५० पुस्तकांची भेट आपल्या वाचनालयासाठी मिळाली. रोटरी क्लब मार्फतही काही पुस्तकांची भेट मिळाली. विद्यार्थी आपल्या वाढदिवसानिमित्त

Scanned with OKEN Scanner

आपल्या ग्रंथालयासाठी पुस्तके भेट देत असतात. ग्रंथालयामध्ये विविध प्रकारीच १२,००० पुस्तके आहेत.

## स्काऊट/गाईड विभाग :-

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षी झालेल्या जिल्हा मेळाव्यात शिर्के प्रशालेतील स्काऊट गाईड विभागाने उत्कृष्ठ कामगिरी केली. १) युनिट नोंदणी - प्रथम क्रमांक, २) खरी कमाई - द्वितीय क्रमांक, ३) शोभा यात्रा - प्रथम क्रमांक, ४) संचलन - द्वितीय क्रमांक, ५) शेकोटी कार्यक्रम - द्वितीय क्रमांक, ६) पोवाडा-द्वितीय क्रमांक.

सन २०१५-१६ ला आपल्या प्रशालेतील ४ स्काऊट व ५ गाईड यांना राज्यपुरस्कार प्राप्त झाले. यावर्षी होणाऱ्या नॅशनल जांभोरीसाठी प्रशालेतील ७ स्काऊटनी सहभाग घेतला आहे. ही जांभोरी म्हैसुर या ठिकाणी होणार आहे.

## सालसेप शालेय किशोरावस्था जीवनकौशल्ये शिक्षण कार्यक्रम :

शालेय किशोरावस्था जीवनकौशल्ये शिक्षण कार्यक्रम (सालसेप) या अंतर्गत दिनांक ०८-०७-२०१६ रोजी विद्यार्थीनींसाठी मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला होता.

१ ऑक्टोबर - जागतिक रक्तदान दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## गरीब विद्यार्थी निधी :-

२०१६-१७ यावर्षी इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरजू विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थ्यांना गणवेश, ४९ विद्यार्थ्यांना ४९ डझन वह्या, ०६ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क, ०१ विद्यार्थ्याला प्रवास शुल्क मिळून सुमारे २५,०००/- रुपयांची वस्तुरुप व आर्थिक मदत देण्यात आली. या निधीला श्री स्वामी स्वरुपानंद सेवा ट्रस्ट, पावसकडून भरीव मदत प्रतिवर्षी मिळत असते.

## * विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारा शिक्षकवृंद :-

**१) श्री. एन. टी. देवळेकर** :- * दिनांक १ ते १० जून २०१६ या कालावधीत आयोजित केलेल्या माध्यमिक शिक्षक जिल्हास्तरीय वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षण वर्गाचे केंद्र संचालक व तज्ञ मार्गदर्शक म्हणून यशस्वी जबाबदारी.

* 'अप्रगत विद्यार्थ्यांचा शोध व उपाययोजना या विषयावर देवरुख सहविचार केंद्राअंतर्गत लोक विद्यालय तुळसणी येथे शिक्षकांसाठी व्याख्यान संपन्न दि. २९-११-२०१६.

**२) श्री. विनोद मयेकर** :- **खेळाडू घडवले** - आंतरराष्ट्रीय ३, राष्ट्रीय १४, राज्यस्तरीय ४१, विभागीय १५०, जिल्हास्तरीय २५०, तालुकास्तरीय ६५. क्रीडा क्षेत्रातील असे यश मिळवणारी जिल्ह्यातील प्रथम शाळा. १ लाखाचे अनुदान मिळाले.

**३) श्री. आर. पी. रहाटे**

* तालुका विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष * जिल्हा गणित अध्यापक संघाचे सचिव

**श्री. बी. डी. पोवार**
**मुख्याध्यापक,**
**रा. भा. शिर्के प्रशाला, रत्नागिरी.**

Scanned with OKEN Scanner